## रे.मु.नं. १७५/२०१० मधील निशाण क्र.१५१ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादीने मयत प्रतिवादी क्र.२ लक्ष्मण कोंडीबा पवार यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जात वादीचे कथन असे की, सदर प्रकरणात वादीने प्रतिवादी यांचे विरुध्द प्रतिदावा दाखल केलेला असून सदर प्रतिदाव्याचे कामकाज चालु असताना प्रतिवादी क्र.२ हे लक्ष्मण कोंडीबा पवार हे दि.०३.०८.२०२१ रोजी कोरोना काळात मयत झालेले आहेत. यातील प्रतिवादी हे निरक्षर व अशिक्षित असल्यामुळे आणि संपुर्ण देशामध्ये लॉकडाऊन असल्यामुळे वादी यांना प्रतिवादी क्र.२ चे वारसांची नावे व पत्ते वेळेत मिळू शकली नाहीत. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर आणता आले नाहीत. त्यामुळे सदर प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. सदरचा दावा हा स्थावर मिळकती संदर्भात असल्यामुळे झालेला विलंब माफ करुन प्रतिवादी क्र.२ चे वारस अभिलेखावर घेणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सबब, मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळावा अशी विनंती केली.

०३. सदर अर्जास प्रतिवादी क्र.३ तर्फे म्हणणे देण्यात आले. प्रतिवादीचे कथन की, अर्जातील कथन व कारण खरे नाही. योग्य कारण दिले नसलेकारणाने अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द डिक्लेरेशन, वाटप व पृथक कब्जा मिळणेकामी दाखल केलेला आहे. तसेच सदर प्रकरणात प्रतिवादी क्र.१ ने वादीविरुध्द जाहीर ठरावाचा प्रतिदावा दाखल केलेला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.२ हे दि.०३.०८.२०२१ रोजी मयत झालेले आहेत. सदर कथनाच्या पुष्ठ्यर्थ वादीने नि.क्र.१३२ वर मयत लक्ष्मण कोंडीबा पवार यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. वादीने सदर अर्जात असे कथन केले आहे की, सदर वादी हा अशिक्षित व निरक्षर असल्याने तसेच प्रतिवादी क्र.२ हे कोरोना काळात मयत झाल्यामुळे सदर वादीस प्रतिवादी क्र.२ यांच्या वारसांची नावे व पत्ते वेळेत मिळू शकली नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झाला. सदर कथनाच्या पुष्ठ्यर्थ वादीने

नि.क्र.१५२ वर प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदरकामी वादीने प्रतिवादी क्र.२ चे कायदेशीर वारस मुदतीत अभिलेखावर घेणे जरुरीचे होते, परंतू वादीस प्रतिवादी क्र.२ च्या वारसांना वेळेत अभिलेखावर आणता आले नाही. त्यामुळे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. वादीचे अर्जात नमूद कारण, तसेच दाव्यातील मागणी पाहता दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी प्रतिवादी क्र.२ च्या वारसांना अभिलेखावर घेणेची संधी देणे हे न्यायाचे ठरेल. जर वादी यांना प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेची संधी देवून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांचे न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. परंतू, वादीने प्रतिवादी क्र.२ च्या वारसास मुदतीत रेकॉर्डवर समावेश न केल्यामुळे प्रतिवादीस विनाकाराण विलंब व मानसिक त्रास सहन करावा लागला. त्यामुळे सदरची बाब वादीवर खर्चाचे आदेश पारीत करुन काही अंशी कमी करता येवू शकते. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. सदरचा अर्ज अर्जदार वादीने रक्कम रु.३००/- प्रतिवादीस खर्च देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2024.12.13 11:05:13 +0530

दिनांक – १२/१२/२०२४.

(एस.एस. साळुंखे)
३रे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.